## चंदुलाल बियाणीला आता सेलू पोलिसांनी घेतले ताब्यात

**परभणी । प्रतिनिधी**

ग्राहकांची फसवणूक केल्याप्रकरणी न्यायालयाच्या आदेशाने सेलू पोलिस पोलि ठाण्यात दाखल गुन्ह्यातराजस्थान मल्टिस्टेटचे अध्यक्ष चंदुलाल बियाणीस बीड कारागृहातून सेलू पोलिसांनी मंगळवारी ताब्यात घेतले. बुधवारी परभणी जिल्हा सत्र न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

मुदत संपूनही पैसे परत दिले नसल्याने अभय सुभेदार (रा. सेलू) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून न्यायालयाच्या आदेशाने १० फेब्रुवारीला सेलू पोलिस ठाण्यात राजस्थानी मल्टिस्टेट क्रेडिट सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष चंदुलाल बियाणी, उपाध्यक्षङ्गङ्गबालचंद लोढा, सचिव बद्रीनारायण बाहेती, सहसचिव पी. डी. अग्रवाल, कोषाध्यक्ष विजय प्रकाश लड्डा, सेलू येथील शाखाधिकारी नंदकिशोर सोमाणी अशा सहा जणांवर गुन्हा दाखल केला होता. आरोपी चंदुलाल बियाणीला २५ फेब्रुवारीला बीड कारागृहातून ताब्यात घेत अटक केली.

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
साय.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

## जिल्हाभरात वाहतूक शारवेची कारवाई; ८ लारवांचा दंड वसूल

**बीड । प्रतिनिधी**

वाहतूक शाखा आणि स्थानिक पोलिसांच्या मदतीने जिल्ह्यातील विविध ठिकाणी वाहधारकांवर कारवाई करीत ८ लाख २० हजार ५५० रु.दंड वसूल करण्यात आला. या क कारवाईमुळे अनेक बेशिस्त वाहनधारकांना चांगलाच दणका बसल्याची चर्चा सुरु झाली आहे.

मागील काही दिवसांपासून चालान वसुली आणि फॅन्सी नंबर, मोठा आवाज करणारे बुलेट सायलेन्सर, विना लायसन्स, विना सीट बेल्ट यास विविध कारवायांचा जिल्ह्यात कारवायांचा धडाका सुरू आहे. गुरुवारी (दि. २७) जिल्ह्यातील पाडळसिंगी टोल नाका, केज टोलनाका, चुंबळी फाटा, धारूर टोल नाका, बर्दापूर टोल नाका, माजलगाव, परभणी टी पॉईट, इटके कॉर्नर परळी, अंभोरा चेक पोस्ट इत्यादी ठिकाणी वाहतूक चलान वसुलीचे मोहीम राबविण्यात आली आहे.

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - १६२ ■ शुक्रवार दि.२८ फेब्रुवारी २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रु. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 162 ■ Friday Dt. 28 February 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

## आ. सुरेश धस नीता अंधारे गणेश पगारेचे आका २०० कोटीचा घोटाळा आणि बीड न.प. ते आ.धसाच्या वाढदिवसाचं कनेक्शन? पुढील अंकात

# मुख्याधिकारी निता अंधारे, गणेश पगारे हटाव बीड शहरातील नागरिक देणार आंदोलनाची हाक!

**न.प. बीड मध्ये दोनशे कोटीचा भ्रष्टाचार तर वसुली विभागातून गणेश पगारेनी ९५ कोटी लुटले?**

## पालकमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन अजित दादांना सविस्तर पुरावे व निवेदन देणार!

**बीडची जनता नीता अंधारे, गणेश पगारे हटाव म्हणून रस्त्यावर उतरणार!**

**बीड । प्रतिनिधी**

**बीड नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी निता अंधारे आल्यापासून चार चार महिने नाल्या व रस्त्यांची साफसफाई होत नाहीये स्वच्छतेचा बट्ट्याबोळ झाला आहे, नागरिकांना पाणी वेळेवर मिळत नाहीये, सहा सहा महिने झाले पथदिवे बंद आहेत. शहराची दैनिय अवस्था झाली असल्याने व बीड नगर परिषदेमध्ये कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार झाल्यामुळे मुख्याधिकारी नीता अंधारे व अकाउंटंट गणेश पगारे यांची बदली व निलंबनासाठी बीड शहरातील नागरिक आता रस्त्यावर उतरणार असल्याचे समजते.**





बीड शहरातील बीड शहरातील ४६ प्रभाग आहेत यातील वेगवेगळ्या प्रभागांमध्ये आज सुद्धा नागरिकांना घरकुल साठी बीड नगरपरिषद मध्ये गेल्यानंतर त्याा ठिकाणी संबंधित घर मालक नागरिकांला साधे पीटीआर वेळेवर मिळत नाहीये, यामुळे गरीबांना घरकुले मिळत नाहीत. बीड नगरपरिषदेच्या प्रत्येक विभागात सावळा गोंधळ सुरू आहे. नवीन रस्ते नाल्या होतांना दिसत नाहीये मात्र बीड शहरातील सिमेंट रोडवर नाल्यांच्या विकास कामाच्या नावावरती कोट्यवधीचे बिले निघत आहेत. जुनेच कामाचे नवे किंवा डबल बिले दिली जाते असे असे चित्र सध्या बीडच्या जनतेला शासन दरबारी फिरणाऱ्या कागदोपत्राने व विविध वर्तमान वर्तमानपत्रातील बातमी यामुळे दिसून येत आहे. बीड नगरपरिषदेत प्रचंड प्रमाणात आवमेळ वाढलेला दिसून येत आहे. नगरपरिषदेचा कारभार दररोज प्रत्योक वर्तमानपत्रांमध्ये बातम्यांच्या माध्यमातून छापून येत आहे.

अतिक्रमणे काढतांना धनदांडग्यांचे सोडून गोरगरिबांचेच अतिक्रमण काढले गेले आहेत, जिथे अतिक्रमणे काढलें पण गटारी साफ केले नाही मग अतिक्र मणे काढण्याचा फायदा काय ? अशा प्रश्न निर्माण झाला. मुख्याधिकारी श्रीमती निता अंधारे गणेश पगारे हा अकाउंटंट हे दोघेजण मिळून प्रशासकाच्या नावाखाली अंधाधुंद आणि मनमानी कारभार करत आहेत. बीड शहरातील नागरिकांना गेल्या पंचवीस वर्षापासून बीड नगरपरिषदेच्या माध्यमातून नागरिकांची सेवा करीत आहे पण एवढचा निष्क्रिय मुख्याधिकारी नगरपरिषदला अकाउंटंट बघीतले नाही असे मत शहरातील अनेक नगरसेवक व सामाजिक कार्यकर्ते व नागरिक यांनी व्यक्त केले आहे. बीड शहरात वेळेवर स्वच्छता पाणी लाईट रस्ते आणि

## गणेश पगारेची कुंडली पाहिली तर नगर परिषदेचा सामान्य कर्मचारी ते कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार करणारा अकाउंटंट चा सविस्तर पुढील अंकात?

नाल्यांचे प्रश्न निकाली काढण्यासाठी बीड शहराला सुंदर बीड बनवायचा असेल तर नीता अंधारे गणेश पगारेंना हटविण्याची गरज आहे. बीड शहरातील रस्ते यांनी नाल्यांची दुरवस्था झालेली आहे. मुख्याधिकारी नीता अंधारे गणेश पगारे यांची तातडीने निलंबन किंवा बदली होणे गरजेचे आहे.

स्वच्छतेच्या नावावर कोट्यावधी रुपयाचा निधी हा टेंडरच्या माध्यमातून गणेश पगारे यांनी गुत्तेदाराच्या आडून लुटला आहे यामध्ये मुख्याधिकारी नीता अंधारे यांना २५% तर गणेश पगारे यांना १५ टक्के निधी टक्केवारीच्या माध्यमातून द्यावा लागतो? तेव्हाच गुत्तेदाराचे बिल निघते व काही गुत्तेदारांच्या सोबत मुख्याधिकारी नीता अंधारे व गणेश पगारे हे अंधारातून गुत्तेदारीमध्ये पार्टनर आहेत बीड शहरामध्ये २०० कोटी रुपयांचा घोटाळा नीता अंधारे गणेश पगार यांनी केलेला आहे तर बीडच्या नगरपरिषद वसुली विभागातून गणेश पगार यांनी ९५ कोटी रुपयांचा घोटाळा केल्याचे चित्र स्पष्ट झाले असताना मात्र आता बीड जिल्ह्यामध्ये चित्र स्पष्ट आहेत. बीड नगर परिषदेचा जर एकदा बीडचे पालकमंत्री व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी चौकशी लावली तर संबंधित प्रकरणाचे भांडाफोड होईल यासाठी बीड शहरातील नागरिक आता रस्त्याावर सर्वसामान्य नागरिकांचा लढा मुख्याधिकारी नीता अंधारे गणेश पगारे यांच्या विरोधामध्ये लढा आदोलन उभा राहण्याची विश्वसनीय माहिती सुत्रांनी दिली आहे. महाराष्ट्र शासन दरबारी हाक देणार आहेत बीडची जनता एक आंदोलनही नीता अंधारे यांच्या विरोधामध्ये सामाजिक कार्यकर्ते व बीड शहरातील जनता उभारणार आहे.



### गणेश पगारे चा मुलगा नगर परिषदेत नेमका स्वच्छता कर्मचारी का गुत्तेदार?

बीड नगर परिषदेमध्ये गणेश पगारे यांनी अक्षरशः नंगानाच लावलेला आहे गणेश पगारेची मुलगी व मुलगा हे दोघेही बीड नगर परिषद मध्ये स्वच्छता कर्मचारी म्हणून कामाला आहेत व त्यांना जात धर्म बदलून दुसऱ्या स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या नियमबाह्य वेगळ्या समाजाच्या व्यक्तीच्या जागेवर अनुकंपा म्हणून नियम डाउनलोड शंभर रुपये बॉण्ड वरती गणेश पगारे नोकरी लावलेली आहे. गणेश पगारे चा मुलगा स्वच्छता कर्मचारी आहे का बीड नगर परिषदेत मध्ये गुत्तेदारी करतो गुत्तेदार आहे का कर्मचारी आहे असा प्रश्न आता नागरिकांना पडला आहेएका आमदाराच्या वाढदिवसानिमित्त गणेश पगारेच्या मुलाच्या नावाने असलेल्या टेंडर मधून बीड नगर परिषदेमधील भ्रष्टाचाराचा पैसा वाढदिवसाला एका ट्रेडर्स च्या नावाने अनेक दैनिकांना जाहिरातीसाठी खर्च केलेला आहे. पुढील अंकांमध्ये सविस्तर मांडणी!

## अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियांच्या मालमत्तांवर दंडाचा बोजा!

## बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांचा दणका; ४० हायवाचालकांना १५० कोटींचा दंड



**गेवराई । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील एकही ठेका दिलेला नसताना हजारो ब्रास वाळूची वाहतूक झाल्याचे गेवराई तालुक्यातील पाडळशिंगी येथील टोलनाक्यावरील सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून समोर आले. त्याानंतर ४० टिप्पर मालकांना जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी तब्बल ३ हजार ३०० नोटिसा बजावून खुलासे मागविले. खुलासे अमान्य केल्यानंतर तब्बल १५० कोटी रुपयांचा दंड लावण्यात आला. आता ही दंडाची रक्कम संबंधित वाळू माफियांच्या मालमत्तांवर बोजा म्हणून नोंद करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. बहुतांशी टिप्पर मालक बीड व गेवराई तालुक्यातील आहेत. बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके, गेवराईचे तहसीलदार खोमणे यांनी संबंधित तलाठ्यांना

### काहींना तीन, चार कोटींचा दंड

वाळूमाफियांनी अवैध वाळू उपसा, वाहतूक करून कोट्यवधी कमावले. आता त्यांच्या मालमत्तांवरही कोट्यवधी रुपयांच्या दंडाची रक्कम बोजा म्हणून नोंदण्यात येणार आहे. काही हायवा मालकांना तीन कोटी तर कोणाला चार कोटी रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

याबाबत पत्र दिले असून बोजा चढविण्याचे आदेश त्यात आहेत.

संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था, वाळू माफियागिरी, अवैध शस्त्र, शेकडो शस्त्र परवाने तसेच परळीतील राख माफियागिरी चव्हाट्यावर आली. यानंतर जिल्हाधिकारी पाठक यांनी या वाळू वाहतुकीचे पाडळशिंगी टोलनाक्यावरील सीसीटीव्ही फुटेज तपासले. ४० माफियांना दंडाची नोटीस बजावली. याविरोधात हायवा मालक न्यायालयात गेल्यानंतर पुन्हा नव्याने नोटिसा बजावून ही प्रक्रिया पुढे सुरू ठेवण्यात आली. गौण खनिजाचा ट्रॉन्झिट पास व जीपीएस यंत्रणेचे अभिलेख, फास्ट टॅग स्टेटमेंट सादर करण्यासाठी जानेवारी महिन्यात निर्देशित केले होते. त्याानंतर या टिप्पर मालकांनी आपले खुलासे सादर केले.

आपण दिलेली नोटीस मुदतबाह्य आहे, नोटीससोबत कोणतेही ठोस पुरावे नाहीत, सीसीटीव्ही फुटेज दिले नाहीत, टोलनाक्यावर राष्ट्रीय मार्ग पोलिस कर्मचारी असतानाही त्यांनी कारवाई केली नाही, यासह इतर मुद्दे मांडून टिप्पर मालकांनी खुलासा सादर केला होता. तो अमान्य करीत जिल्हाधिकाऱ्यांनी जेवढ्या फेऱ्या तेवढ्या नोटिसा या आधारावर ४० टिप्पर मालकांना तीन हजार ३०० नोटिसा पाठविल्या. प्रत्योक फेरीस चार लाख ५७ हजारांप्रमाणे ३ हजार ३०० फेऱ्यांसाठी १५० कोटी रुपये दंड ठोठावला. आता या दंडाच्या रकमा वाळू माफियांच्या स्थावर मालमत्तांवर बोजा म्हणून नोंद करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

### “दंड वसुलीसाठी कायदेशीर मार्ग

महाराष्ट्र जमीन महसूल कायद्यानुसार दंड वसुलीसाठी ही रक्कम बोजा म्हणून संबंधितांच्या स्थावर मालमत्तांवर नोंदविण्यात येत आहे. दंड वसुलीसाठी सर्व कायदेशीर मार्ग अवलंबण्यात येत आहेत.

– अविनाश पाठक,
जिल्हाधिकारी, बीड.

# शेतीपूरक ई-वाहनामुळे शेतकऱ्यांना होणार लाभ

## महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरणात इलेक्ट्रिक ट्रॅक्टर, पॉवर टिलर व कटरचा समावेश

मुंबई । प्रतिनिधी

राज्य शासनाने आपल्या इलेक्ट्रिक वाहन धोरणात एक महत्त्वपूर्ण बदल केला आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी आता इलेक्ट्रिक ट्रॅक्टर, पॉवर टिलर आणि कटरचा समावेश महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरणात केला आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना शेती कामासाठी आवश्यक असलेल्या या ई वाहनांचा उपयोग करणे सोपे होणार आहे. पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांच्या पुढाकाराने हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.

ईलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि वातावरणातील प्रदूषण कमी करण्याच्या उद्देशाने राज्य सरकारने महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण जाहीर केले होते. मात्र, सुरुवातीला या धोरणात शेतकऱ्यांसाठी उपयुक्त असलेल्या इलेक्ट्रिक ट्रॅक्टर, पॉवर टिलर आणि कटरचा समावेश नव्हता. त्याावर विचार करून, मंत्री पंकजा मुंडे यांनी या वाहनांचा समावेश धोरणात केला आहे. यासंबंधीच्या शासन निर्णयाचे शुद्धिपत्रक आज काढण्यात आला आहे.

### ना.पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकाराने पर्यावरण विभागाने घेतला निर्णय



शेतकऱ्यांसाठी फायदे

शेतीकामांसाठी ईलेक्ट्रिक वाहनांचा वापर केल्यास शेतकऱ्यांचा इंधनावरील खर्च कमी होईल आणि पर्यावरणावर होणारा नकारात्मक प्रभावही कमी होईल. यामुळे वातावरणातील वायू प्रदूषणात घट होईल आणि शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या देखील फायदा होईल. याशिवाय, इलेक्ट्रिक वाहने जास्त वेळ चालतात, कमी देखभाल खर्च होतो आणि ऊर्जा वापरामुळे कमी इंधनाची आवश्यकता आहे. महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरणानुसार, बॅटरीवरील वाहनांची खरेदी करणाऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान दिले जाणार आहे. या योजनेचा फायदा आता शेतकऱ्यांना इलेक्ट्रिक ट्रॅक्टर, पॉवर टिलर आणि कटर खरेदी करतांना होईल. राज्य सरकारने यासंबंधीचा शासन निर्णय आजच जारी केला आहे.

या धोरणामुळे फक्त शेतकऱ्यांना फायदे होणार नाहीत, तर पर्यावरण व वातावरणीय बदलाचा प्रभावही कमी होईल. इलेक्ट्रिक वाहने प्रदूषण कमी करण्यास मदत करतील, ज्यामुळे स्वच्छ हवा मिळवता येईल. याशिवाय, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांमध्ये इलेक्ट्रिक वाहने वापरण्याची आवड निर्माण होईल, जेणेकरून पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाची स्वीकृती वाढेल. या धोरणामुळे महाराष्ट्र राज्यात शेतीच्या कामामध्येही इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढेल आणि शेतकऱ्यांना अधिक सुलभ आणि किफायतशीर साधने मिळतील, असे मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.

# सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो : तहसीलदार

## ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

धारूर । प्रतिनिधी

तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात आघाडीवर असलेल्या ज्ञानदीप प्राथमिक विद्यालय व बाल संस्कार केंद्र किल्ले धारूर येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रतिष्ठित व्यापारी आनंद भावठाणकर तर प्रमुख पाहुणे म्हणून तहसिलदार श्रीकांत निळे, सहायक पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे, मुख्याधिकारी महेश गायकवाड, पालक प्रतिनिधी श्रीमती सोनाली तोंडे , सुधीर शिनगारे, सय्यद शाकेर, अनिल महाजन, नागनाथ सोनटक्के, मनोज कापसे, शेख एस एस हे मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.



यानंतर विद्यालयातील बालकलाकारांनी विविध मराठी, हिंदी गीते, पोवाडे, नाटके, देशभक्तीपर गीते, कॉमेडी थीम, लोप पावत चाललेल्या कलांचे सादरीकरण करत आपला कलाविष्कार सादर करत उपस्थितांची मने जिंकली यावेळी कार्यक्रमाचे सूत्रासंचालन विद्यालयातील बाल चिमुकल्यांनी करत कार्यक्रमाची पूर्ण धुरा सांभाळत कार्यक्रमाची शोभा वाढवली या वार्षिक स्नेहसंमेलसाठी विद्यालयातील पालक, माता पालक, धारूर शहरातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थेचे सर्व पदाधिकारी, विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. शेख एस. एस. व सांस्कृतिक विभागाचे प्रमुख मुंजाराम निरडे, शैला महाजन, स्नेहल शिनगारे, रोहिणी पटाईत व सर्व शिक्षक वृंद यांच्या अथक परिश्रमातून कार्यक्रम यशस्वीरित्याा संपन्न झाला.

# पिंपळेश्वराच्या दर्शनासाठी लोटला भक्तांचा महासागर

## आ. सुरेश धस यांनी सपत्नीक केला महाभिषेक

आष्टी । प्रतिनिधी

सालाबादप्रमाणे याही वर्षी आष्टी शहरातील पिंपळेश्वर महादेव मंदिराच्या प्रांगणात महाशिवरात्री निमित्त भक्तांचा महासागर लोटला. महाशिवरात्रीच्या प्रारंभी आ.सुरेश धस यांनी सपतीक महाभिषेक केला.तर पहाटे ४ ते ७ वाजेपर्यंत सार्वजनिक अभिषेक संपन्न झाले. मात्र यावर्षी भाविकांच्या प्रचंड गर्दीने आत्तापर्यंतचे सर्व रेकॉर्ड मोडले असल्याचे यावेळी दिसून आले.

बुधवारी महाशिवरात्री निमित्त आष्टी शहरातील ग्रामदैवत असलेल्या पिंपळेश्वर महादेव मंदिरात पहाटे पासूनच भक्तांची रीघ लागली होती. तत्पूर्वी आ.सुरेश धस यांनी प्रारंभी सपतीक महाभिषेक केला. या प्रसंगी निवृत्त जिल्हाधिकारी सुनील चव्हाण हे देखील उपस्थित होते. पहाटे ४ ते ७ यावेळेत भाविक भक्तांनी भक्तांचे अभिषेक संपन्न झाले. सकाळी ७ वाजल्यापासूनच मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर भक्तांनी गर्दी केली होती. रात्री उशिरापर्यंत या गर्दीने मंदिर परिसर फुलून गेला होता. मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. तर सायंकाळी फटाक्याच्या आतषबाजीने सर्वांचे लक्ष वेधले होते.

आष्टी तालुक्यासह राज्यातील कानाकोपऱ्यातून आलेल्या भाविकांनी दर्शन घेतले. सायंकाळी पारंपरिक गोंधळ गीतांचा कार्यक्रम संपन्न झाला. तर भाविकांसाठी उपवासाच्या निमित्ताने महाप्रसादाचे देखील आयोजन करण्यात आले होते.आज गुरुवार दि.२७ रोजी दुपारी शहरातून पारंपरिक वाद्यासह पिंपळेश्वर महादेवाच्या प्रतिमेची भव्य शोभा यात्रा संपन्न होणार असून या शोभायात्रेत सहभागी होण्याचे आवाहन मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

शिव पार्वती रांगोळीने लक्ष वेधले. या वेळी मंदिर परिसरात श्रीमती कोमल थेटे यांनी भगवान शिव- पार्वती रांगोळीच्या माध्यमातून साकारलेल्या प्रतिकृतीने सर्वांचे लक्ष वेधले. तब्बल ५ तास ही रांगोळी काढण्यासाठी लागले. ४ ६ आकारात ही रांगोळी साकारण्यात आली होती.

मोफत चहाचे वाटप

शहरातील हॉटेल व्यावसायिक असलेले दत्ता राऊत यांनी सालाबादप्रमाणे यंदाही भाविकांसाठी मोफत चहाचे वाटप केले होते.त्याामुळे आलेल्या प्रत्योक भाविकांनी याचा लाभ घेतल्याने ही अविरत सेवा कायम ठेवण्याचा संकल्प दत्ता राऊत यांनी बोलून दाखवला.





# पालक आणि पनीर एकत्र खाणे आरोग्यासाठी धोकादायक?

भारतामधील विविध राज्यांमधील अनेक पदार्थ खूप लोकप्रिय आहेत. जे आता फक्त भारतातच नाही तर जगातील अनेक भागांत प्रसिद्ध आहेत. त्याातीलच एक म्हणजे पालक पनीर. पालक आणि पनीर या दोन्ही गोष्टी आरोग्यासाठी अत्यांत फायदेशीर असल्याचे म्हटले जाते. परंतु, तुम्हाला ठाऊक आहे का? पालक पनीरची भाजी निरोगी अन्न संयोजन नाही, पोषणतज्ज्ञ नमामी अग्रवाल यांनी त्याांच्या एका इन्स्टाग्राम व्हिडीओमध्ये याबाबत खुलासा केला आहे.

''निरोगी खाणे म्हणजे फक्त योग्य अन्नपदार्थ खाणे असे नाही. याचा अर्थ, योग्य संयोजन असलेले योग्य अन्नपदार्थ खाणे,'' अग्रवाल म्हणाले की, असे काही संयोजन आहेत, जे एकत्रा खाल्ले तर ''एकमेकांचे पोषक शोषण रोखतात.'' कॅल्शियम आणि लोह हे असेच एक मिश्रण आहे. तज्ज्ञांच्या मते पालकमध्ये भरपूर लोह असते आणि पनीरमध्ये कॅल्शियम भरपूर असते. ''जेव्हा हे दोन पदार्थ एकत्रा खाल्ले जातात तेव्हा कॅल्शियम लोहाचे पोषक शोषण रोखते, त्याामुळे लोहाच्या जास्तीत जास्त वापरासाठी पालक पनीरच्या जागी पालक-बटाटा किंवा पालक-मक्याची भाजी खा'' असे त्याांनी सांगितले.

पोषणतज्ज्ञ आणि  च्या संस्थापक सोनिया बक्षी यांनी सहमती दर्शवली आणि त्याांनी इंडियन एक्स्प्रेस डॉट कॉमला सांगितले की, कॅल्शियम एकत्रा घेतल्यास लोहाचे शोषण रोखते, कारण ''कॅल्शियम आणि लोह दोन्ही एकाच रिसेप्टर्ससाठी स्पर्धा करतात आणि म्हणूनच दूध, चहा, कॉफी किंवा इतर दुग्धजन्य पदार्थासह लोह पूरक आहार घेऊ नये. याच कारणासाठी जेवणाबरोबर चहा किंवा कॉफीचे सेवन करू नये. मसूर आणि सोयाबीनमध्ये भरपूर लोह असते आणि म्हणूनच दही हे छोले, राजमा आणि डाळ यांच्याबरोबर घेऊ नये. त्याामुळे भरपूर लोह असलेली पालक पनीरबरोबर खाऊ नये,'' असे त्याांनी सांगितले. याच कारणासाठी जेवणाबरोबर चहा किंवा कॉफीचे सेवन करू नये. मसूर आणि सोयाबीनमध्ये भरपूर लोह असते आणि म्हणूनच दही हे छोले, राजमा आणि डाळ यांच्याबरोबर घेऊ नये.

फिटनेस आणि पौष्टिक शास्त्राज्ञ आणि फूड दरझीचे सह-संस्थापक डॉ. सिद्धांत भार्गव, यांनी सांगितले की, पालक-पनीर खरोखरच आरोग्यदायी जेवण नाही. काही पदार्थ एकत्रा खाणे आरोग्यासाठी फायदेशीर नसते. ते एकमेकांची पोषण शोषण क्षमता मर्यादित करतात. कॅल्शियम आणि लोह हे असेच एक मिश्रण आहे. पालक-पनीरमध्ये, पनीरमध्ये असलेले कॅल्शियम हेम आणि नॉन-हेम लोहाचे शोषण मर्यादित करते,'' असे त्याांनी सांगितले.

# ‘लाँग कोविड’ असलेल्या लहान मुलांच्या फुफ्फुसांना गंभीर इजा

**एका नवीन आभ्यासात ‘लाँग कोविड’ने ग्रस्त असलेली लहान मुले आणि किशोरवयीन तरूणांच्या फुफ्फुसांमध्ये मोठ्या प्रमाणात विकृती दिसून आल्याचे समोर आले आहे. रेडिएशन किंवा कॉन्ट्रास्ट डाईजची आवश्यकता नसलेल्या  एमआरआय या प्रगत तंत्राचा वापर करून ही माहिती सादर करण्यात आली आहे. या अभ्यासासंबंधीचे निष्कर्ष रेडिओलॉजी या जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहेत.**

कोविडनंतर फुफ्फुसांच्या समस्या जाणवत असलेल्या प्रौढ व्यक्तींच्या फुफ्फुसांना झालेले नुकसान मोजण्यासाठी छातीचे स्कॅन केले जाते. मात्र लाँग कोविड असलेल्या मुलांबाबत हे स्कॅन साधारणपणे वापरले जात नाहीत. कारण यामुळे तरुण रुग्णांना रेडिएशनचा धोका असतो आणि त्याांना इंट्राव्हेनस कॉन्ट्रास्ट एजंट्सची आवश्यकता असते, जे त्याांच्यासाठी अस्वस्थ करणारे आणि नियंत्राणाच्या बाहेर जाणारे असू शकते. यामुळे मुलांच्या बाबतीत लंग परफ्यूजन किंवा फुफ्फुसातून रक्त आत आणि बाहेर कसे जाते-येते याबद्दल माहिती घेणे कठीण जाते.

लाँग कोविड असलेल्या लहान मुलांमध्ये आणि किशोरवयीन मुलांच्या प्रगत एमआरआ स्कॅनमध्ये फुफ्फुसात मोठ्या प्रमाणात विकृती आढळून आल्या आहेत. हे प्रगत एमआरआय त्त्रां फ्री-ब्रेथिंग फेज-रिझोल्ड फंक्शनल लंग () या नावाने ओळखले जाते. या अभ्यासाचे निष्कर्ष काल रेडिओलॉजी या जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहेत.

एमआरआय म्हणजे, फ्री-ब्रेथिंग फेज-रिझोल्ड फंक्शनल लंग एमआरआय. पारंपारिक एमआरआयच्या उलट  एमआरआय मध्ये डॉक्टरांना मुलांचे श्वसन सामान्यपणे सुरू असताना देखील फुफ्फुसे स्कॅन करता येते. तसेच हे पूर्णपणे रेडिएशन-फ्री असून यामध्ये कोणत्याही कॉन्ट्रास्ट डाईची आवश्यकता नसते, ज्यामुळे हे कमी वयाच्या रुग्णांसाठी अधिक सुरक्षित ठरते.

या अभ्यासासाठी २७ लाँग कोविड असलेले आणि २७ लाँग कोविड नसलेल्या एकूण ५४ जणांनी सहभाग घेतला होता. एप्रिल २०२२ ते एप्रिल २०२३ पर्यंत त्याांचे  केले गेले. अभ्यासात सहभाही झालेल्या अर्ध्या लोकांना लाँग कोविड होता, तर उर्वरित अर्ध्या लोकांना असा काही त्रास नव्हता. या सहभागींचे सरासरी वय १५ वर्षे होते. एमआरआयनमध्ये रिजनल व्हेंटिलेशन (ऑक्सिजन प्रवाह), फ्लो-व्हॉल्युम लूप कोरिलेशन मेट्रिक (-), क्वांटिफाइड परफ्यूजन (रक्त प्रवाह), व्हेंटिलेशन आणि परफ्यूजन डिफेक्ट टक्केवारी आणि व्हेंटिलेशन-परफ्यूजन गुणोत्तरांचे मोजमाप केले गेले.



## नवीन अभ्यासातून समोर आली धक्कादायक माहिती

**आभ्यासात काय दिसून आले?**

दरम्यान या स्कॅनमधून असे दिसून आले की लाँग कोविड असलेल्या मुलांमध्ये आणि किशोरवयीन तरुणांच्या फुफ्फुसांना इजा झाल्याची चिन्हे स्पष्ट दिसून आली आहेत. विशेष म्हणजे स्टँडर्ड चाचण्यांमध्ये ही चिन्हे आढळून आली नव्हती. त्याांच्या फुफ्फुसांमध्ये रक्त प्रवाह (परफ्यूजन) कमी झाला होता आणि व्हेटिलेशन-परफ्यूजनमध्येही विसंगती दिसून आली, म्हणजेच याचा अर्थ असा की फुफ्फुसांमधील काही भाग हवेचा प्रवाह आणि रक्तचा प्रवाह योग्य पद्धतीने बॅलेन्स करत नव्हता.

**लाँग कोविड म्हणजे काय?**

करोनामुक्तीनंतरही करोनाची लक्षणे रुग्णांमध्ये चार ते १२ आठवड्यांपर्यंत दिसू शकतात. काही प्रकरणांमध्ये हा कालावधी अधिक असू शकतो, असं डॉक्टर सांगतात. या लक्षणांमुळे अनेकदा करोनावर मात केलेल्या रुग्णांना पुन्हा एकदा आपल्याला करोनाचा संसर्ग झाला की काय असं वाटू लागतं. या अशापद्धतीच्या आजारपणाला पोस्ट कोव्हिड सिंड्रोम किंवा लाँग कोविड असे म्हणतात.

# महिलांची सुरक्षिता वाऱ्यावर

## फडणवीसांनी सक्षम व्यक्तीकडे गृहमंत्री पद द्यावे : खेडकर, मोरे

बीड । प्रतिनिधी

या राज्यात महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न वारंवार येत असला तरी, एखादी घटना की तेवढ्यापुरते या विषयावर चर्चा होते, पण प्रत्याक्षात या सुरक्षितेतसाठी कोणतीही ठोस उपासयोजना होत नाह, त्याामुळे राज्यात सातत्याने महिलांवरील अत्याचाराचा घटना येताना दिसतात. गेल्या काही महिन्यांमध्ये अत्याचाराचा घटनेत वाढत होताना दिसू लागली आहे. राज्यात दररोज कुठे ना कुठेतरी अत्याचाराची घटना घडल्याचे समोर येत आहे. कायदा आणि सुव्यवस्था या राज्यात आहे की नाही, कायद्याच्या धाक आहे की नाही, आरोपींचे असे कृत्या करण्याचे धाडस वाढते कसे, असे अनेक प्रश्न या निमित्ताने समोर येत आहेत. एक सुसंस्कृत शहर म्हणून ज्या पुणे शहराचा उल्लेख केला जातो, त्या शहरात गुन्हेगारीचे प्रमाण खूप वाढले असल्याचेच दिसते.

दहशत निर्माण करणाऱ्या अनेक गँग पुण्यात तयार झाल्या आहेत. एका बाजूला वाढणारी गुन्हेगारी आणि दुसऱ्या बाजूला महिलांवर अत्याचार वाढू लागले आहेत. पुण्यात घडलेल्या घटनेने पुन्हा एकदा महिला सुरक्षित नाहीत, हेच वास्तव समोर झाले आहे. पुण्यात वर्दळीचे असलेल्या स्वारगेट एसटी स्टँडवर शिवशाही बसमध्ये एका तरुणीवर अत्याचार झाला. सोमवारी पार्टीच्या सुमाराची घटना घडली. पीडीत तरुणी पुण्याहून फलटणला जाण्यासाठी स्वारगेट बस स्थानकावर आली होती त्याावेळी ही घटना घडली. आरोपीने या तरुणीला दुसरी बस लवकर निघते, सांगत बाजूला उभ्या असलेल्या एका शिवशाही बसकडे नेले आणि त्याानंतर या बस मध्ये अत्याचार करण्यात आला. ही बाब इतकी धक्कादायक आहे की अत्यांत गजबजलेल्या बस स्थानकात उभ्या असलेल्या बसकडे कोणाचेच कसे काय लक्ष गेले नसेल, हा प्रश्न तर आहेच, पण बस स्थानकातील सुरक्षारक्षक झोपा काढत होता का, असाही प्रश्न पडतो.बस स्थानकात आलेल्या प्रवाशांची काळजी घेणे आणि त्यांच्या



सुरक्षिततेची काळजी घेण्याची जबाबदारी येथील कर्मचाऱ्यांचे असते. गजबजलेल्या ठिकाणी जर असे प्रकार घडत असतील तर ही अतिशय चिंता करायला लावणारी बाब आहे. संस्कृत शहरात घडलेल्या घटनेने महाराष्ट्र पार हादरून गेला आहे. स्वारगेट पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दत्तात्राय रामदास गाडे असे आरोपीचे नाव आहे.

याप्रकरणी पोलिसांच्या आठ पथके त्याचा शोध घेण्यासाठी रवाना झालेत. आता पुण्याचे पालकमंत्री आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. अजित दादा पवार यांनी नुकतंच प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी त्याांना पुण्यातील घटनेबद्दल विचारणा करण्यात आली. पवार त्याांनी सविस्तर प्रतिक्रिया दिली. काही करून तो आरोपी सापडला पाहिजे. त्याला फाशीची शिक्षा झाली पाहिजे, असे अजित दादा पवार म्हणाले. महाराष्ट्रात ही अशी दुर्दैवी घटना घडण अतिशय क्लेशदायक आहेत, याबद्दल कोणाचंच दुमत असण्याचे कारण नाही. पण आपण सर्व काळजी घेण्याचा प्रयत करतोय, तरी या घटना घडत आहेत सर्व सीसीटीव्हीची बारकाईने पाहणे करायला सांगितले आहे. इथे सीसीटीव्ही प्रवासीही दिसतात. आणि शिवाजीनगर या बस डेपोत ठिकाणी वर्दळ असते. काही करून तो आरोपी सापडला पाहिजे. त्याला फाशीची शिक्षा झाली पाहिजे . या मुलीवर हा प्रसंग उद्भवला आहे त्या मुलींच्या बाबतीत ज्या काही गोष्टी करायचे आहे ते करण्याचा सूचना दिलेल्या आहेत. ते त्या जिल्ह्याच्या पालकमंत्री असल्याचे मलाही तो गोष्ट ऐकल्यानंतर अतिशय मनस्ताप झाला, असेही अजित पवार म्हणाले. या घटनेच्या अनुषंगाने पवारांनी आपले मत व्यक्त केले आहे. राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेच्या प्रश्न चव्हाट्यावर आला असल्याचे सरकारने आता अतिशय कठोर पावले उचलणे आवश्यक बनले आहे. महिलांच्या सुरक्षिततेसाठी केवळ कागदावरचे धोरण अवलंबून चालणार नाही तर त्यासाठी काही ठोस निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. राज्यातील अनेक बस स्थानकात रात्री अंधार असतो. प्रवासी महिला या अंधारात बस ची वाट बघत बसतात. अनेक बस स्थानकात हिरकणी कक्ष महिलांसाठी तयार करण्यात आलेला असला तरी या हिरकणी कक्षात भटकी कुत्रे ठिय्या मांडून बसलेले असतात. बस स्थानकात स्वच्छता नसते. पिण्याच्या पाण्याची सुविधा नसते, चांगली स्वच्छतागृहे नसतात.

रात्रीच्या वेळी बसस्थानक म्हणजे जुगारी आणि मध्यपिनचा अड्डा बनते. महिलांच्या छेडछाडीचे अनेक प्रकार सातत्याने बस स्थानकात घडत असल्याच्या तक्रारी येतात, पण अशा छेडछाड करणाऱ्यांचा बंदोबस्त केला जात नाही. बस स्थानकाला गुन्हेगारांचा अक्षरशा विळखा असतो, पण त्यासाठी कसलीही उपाययोजना महामंडळाकडून केली जाताना दिसत नाही. अनेक बस स्थानकात सुरक्षा रक्षक नसतात. माझ्या शहरातील बस स्थानकात पोलीस असले तरी ते केवळ नावापुरतेच असतात. त्यामुळे बस स्थानकात महिलांच्या सुरक्षिततेसाठी योग्य व्यवस्था करण्यात धोरणनहि आता महामंडळाने हाती घेणे आवश्यक आहे. बस स्थानक छोटे असो की मोठे, या ठिकाणी २४ तास सुरक्षा असली पाहिजे. बस स्थानके गाव गुंडांचा अड्डा बनलेले आहेत. साहेब बंदोबस्त करण्यासाठी महामंडळाने पावले उचलली पाहिजे, याचवेळी आवश्यक त्या सर्व सुविधाही दिल्या पाहिजेत.



## दिव्यांग आघाडी बीड जिल्हाध्यपदी शाहू डोळस

बीड । प्रतिनिधी

दिनांक २३/०२/२०२५ रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडीया (आठवले) माध्यमातुन बीड जिल्ह्यात गेल्या तिस वर्षापासून बीड जिल्ह्यात निराधार, अत्याचारीत, पीडीत दिव्यांग महिला तसेच चळवळी मध्ये कार्यरत राहुन आनेक आंदोलने करून दिन दलीत महीला तसेच दिव्यांग बांधवांना न्याय मिळवुन देण्याची धडपड पाहून त्यांनी केलेले सामाजीक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य व चळवळीत कार्यरत आसतांना दिन दलीत, निराधार, शोषीत पिडीतांना न्याय देण्यासाठी गेल्या तिस वर्षापासूनचा अविरत संघर्ष याची दखल घेवुन रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडीयाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजीक न्याय राज्य मंत्री मा. ना. रामदासजी आठवले साहेबांच्या आदेशावरून युवक रिपाई महाराष्ट्र अध्यक्ष पप्पुजी कागदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली रिपब्लीकन पार्टी च्या दिव्यांग आघाडीचे प्रदेश अध्यक्ष मा. सुरेशजी माने पाटील यांनी शाहू नारायण डोळस रा. चऱ्हाटा, ता.जि.बीड यांची बीड जिल्हा रिपब्लीकन पक्षाच्या दिव्यांग आघाडीच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी निवड केली.

या निवडीचे नियुक्तीपत्र रिपब्लीकन पक्षाच्या जिल्हा मध्यवर्ती कार्यालयामध्ये युवक रिपाई महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मा. पप्पुजी कागदे साहेब, रिपब्लीकन पक्षाच्या दिव्यांग आघाडीचे प्रदेश अध्यक्ष मा. सुरेशजी माने पाटील यांच्या हस्ते शाहूराव डोळस यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी रिपाई जिल्हा सरचिटणीस राजुजी जोगदंड रिपाई बीड तालुका अध्यक्ष किसन तांगडे रिपाई गेवराई ता. अध्यक्ष किशोर कांडेकर, युविक रिपाई बीड तालूका अध्यक्ष सुभाष तांगडे, माजी सरपंच नागेश शिंदे, रिपाई शहर अध्यक्ष अविनाश जोगदंड, रिपाई पिंपळनेर सर्कल अध्यक्ष सतिष शिनगारे, आप्पा मिसळे, राहुल कोरडे, बाबुराव भालेराव, विजय साबळे, दिलीप ससाने, भागवत साबळे, श्रीरंग वाघमारे, प्रकाश ससाने, राजाभाऊ शिंदे, प्रविण सोनवणे, नानासाहेब धन्वे, संजय शिंदे, नितीन शिंदे, सुंदर वाघमारे, नितीन सोनवणे आदींची उपस्थीती होती. सर्व स्तरातून शाहू डोळस यांच्या अभिनंदन होत असून, पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

बीड । प्रतिनिधी

बीड येथील शिवलाय प्रतिष्ठानच्या व टेलिकॉम असोसिएशनच्या बीड च्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. या वेळी महाराजांना अभिवादन करण्यात आले. शिवजयंती चे अध्यक्ष व कार्यकारणीतील सदस्य तसेच तालुक्यातील टेलिकॉम असोसिएशन सदस्य परिवारासह उपस्थित होते. यावेळी लहान मुलांचे विविध गुणर्शन, रक्तदान शिबीर, नृत्या, शिवचरित्र व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

यावेळी शिवचरित्र व्याख्यानात रित्तन संतोष सानप,पूनम गजानन घोलप, स्वरांजली गणेश थोरात या चिमुकल्याणी भाग घेतला व या वेळी लहान बालकांनी नृत्या सादर केले. या मध्ये काव्या गणेश चटप, सायली संभाजी साबळे या लहानग्या बालकांनी सहभाग घेतला. यावेळी अनेकांनी रक्तदान शिबिरात भाग घेऊन रक्तदान केले. कार्यक्रमाची सांगता अन्नदान करून झाली. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता आयोजक विवेक गव्हाणे, बाजीराव इंगोले, संतोष सानप, शिवाजी रोहिटे, गणेश चटप यांच्या सोबत सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## श्री बंकटस्वामी महाविद्यालयात नेत्रदान व अवयवदान जनजागृती शिबिर

बीड । प्रतिनिधी

दिनांक २५ फेब्रुवारी २०२५ रोजी येथील श्री बंकटस्वामी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वातंत्र्यावीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त मरणोत्तर नेत्रादान व अवयवदान जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमात बीड शासकीय रुग्णालयातील नेत्रदान सल्लागार श्रीमती सी.एस. गुरव या प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होत्याा, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विवेक मिरगणे होते.कार्यक्रमात मार्गदर्शन करताना श्रीमती सी.एस.गुरव यांनी नेत्रादान व अवयवदानाचे सामाजिक आणि वैद्यकीय महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, ''नेत्रादानामुळे दृष्टिहीन व्यक्तींना पुन्हा प्रकाश मिळतो, तर अवयवदानामुळे गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्णांना नवजीवन मिळू शकते. भारतात लाखो लोक अवयव प्रत्यारोपणासाठी प्रतीक्षेत असतात, मात्र अवयवदात्यांची संख्या अत्याल्प आहे. त्यांनी यापुढे स्पष्ट केले की, मृत्यूनंतर डोळे, मूत्रपिंड, हृदय, यकृत, फुफ्फुसे, स्वादुपिंड यांसारखे अवयव दान करून अनेक लोकांचे प्राण वाचवले जाऊ शकतात. ''एका नेत्रदानामुळे दोन जणांना दृष्टी मिळू शकते, तर अवयवदानामुळे



आठ ते दहा जणांचे प्राण वाचू शकतात,'' असे त्यांनी नमूद केले.समाजासाठी प्रेरणादायी पाऊलया वेळी समाजासाठी प्रेरणादायी पाऊल उचलत प्राध्यापिका श्रीमती छाया सोंडगे यांनी मरणोत्तर नेत्रादान व देहदान फॉर्म भरून शासकीय रुग्णालयाकडे देण्याची घोषणा केली. त्यांच्या या निर्णयाचे उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले.विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता व गैरसमजुती दूर करण्यासाठी विद्यार्थ्यांनी यासंदर्भात विविध प्रश्न विचारून सखोल माहिती मिळवली. ''अवयवदानाबाबत असलेल्या गैरसमजुती दूर करण्यासाठी अशा उपक्रमांची समाजाला नितांत आवश्यकता आहे,'' असे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विवेक मिरगणे यांनी व्यक्त केले.या उपक्रमामुळे नेत्रादान व अवयवदानाबाबत समाजात सकारात्मक संदेश पसरवण्यास मदत होणार आहे. ''मृत्यूनंतरही आपले अवयव कुणाला तरी जीवनदान देऊ शकतात, ही भावना रुजवण्यासाठी अशा जनजागृती उपक्रमांची गरज आहे,'' असे मत व्यक्त केले.या जनजागृती शिबिरास महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी, स्वयंसेवक, प्राध्यापक, शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन

धारूर । प्रतिनिधी

२८ फेब्रुवारी रोजी भारतीय थोर शास्त्राज्ञ डॉ.सी. व्ही. रामन यांनी लावलेल्या रामन इफेक्ट हा शोध या निमित्त किल्ले धारूर येथील सरस्वती विद्यालयात बाल वैज्ञानिकांनी विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमांमध्ये सर्वप्रथम डॉ.सी.व्ही. रामन यांच्या विषयी शाळेतील विज्ञान शिक्षक कुलकर्णी सर यांनी डॉ.सी. व्ही रामन यांच्या विषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

विज्ञानाचे जीवनाशी असलेले महत्त्व श्रद्धा व अंधश्रद्धा यांच्यातील फरक याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले त्याानंतर या प्रदर्शनाचे उद्घाटन प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक डोंगरे सर ,राठोड सर, तोष्णीवाल सर यांनी प्रदर्शनाचे उद्घाटन केले. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कल्पकतेतून मांडलेले प्रयोग अत्यांत उत्कृष्ट होते या प्रयोगाचे सर्व ठिकाणाहून कौतुक होत आहे हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षीका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## हवालदार सुखदेव वनवे यांचे गावात आगमन होताच ग्रामस्थांनी पुष्पवृष्टी करत केले जंगी स्वागत



आष्टी । सुरेश कांबळे

देशसेवा पूर्ण करून तरुण आपल्या जन्मभूमीत येताच युवकांनी व ग्रामस्थांनी खांद्यावर उचलून घेऊन पुष्पवृष्टी करत धूमधडाक्यात जंगी स्वागत करत फटाक्याची आतिषबाजी करून आनंदोत्सव व्यक्त केला.

आष्टी तालुक्यातील सुरुर्डी येथील सुखदेव नवनाथ वनवे हे दि. १६ जून २००५ रोजी हवलदार म्हणून सैन्य दलात भरती झाले आहे सुखदेव नवनाथ वनवे यांनी सैन्य दलात तब्बल २० वर्षी आपली इनामे इदबारे सेवा केली. २० वर्षाच्या कालखंडात उत्तराखंड, जम्मू काश्मीर,लेह लद्दाख, जोधपूर राजस्थान, पंजाब, पश्चिम बंगाल, सिक्किम आदी ठिकाणी आपल्या मायभूमीची सेवा करुन आपल्या आष्टी तालुक्यातील सुरुर्डी येथील जन्मभूमीत बुधवारी परताच सर्व ग्रामस्थांनी व युवकांनी एकत्रीत येऊन हवालदार सुखदेव वनवे यांना डोक्यावर उचलून घेतले व फटाक्यांची आतिषबाजी व पारंपरिक नृत्या सादर करत रंगे बेरंगी फुलांनी व फुगयांनी सजवलेल्या चार चाकी गाडी मधून भव्य मिरवणूक काढण्यात आली.या वेळी सुखदेव वनवे यांची पती,आई, वडिल यांची हि या सजवलेल्या चारचाकी गाडीमधून मिरवणूक काढण्यात आली.

यावेळी तरूण मित्रांनी सुखदेव वनवे यांना आक्षरक्षःहा डोक्यावर उचलून घेत गावातून मिरवणूक काढली व जंगी स्वागत केले यावेळी गावातील महिला भगिनींनी हवलदार सुखदेव वनवे यांचे औक्षण करत साखर भरवून अनोख्या पध्दतीने स्वागत करण्यात आले. यावेळी गावचे सरपंच, उपसरपंच व प्रतिष्ठातीत नागरिक व त्रिदल सेवा संघ महाराष्ट्र राज्य पदाधिकारी आष्टी यांच्या वतीने हवालदार यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले आहे.

## राष्ट्रसंत गाडगे बाबा यांची काळेवाडी येथे पारंपरिक पद्धतीने जयंती उत्साहात साजरी

### गोपाला गोपाला देवकी नदंन गोपाला जय घोषाने काळेवाडी दुमदुमली

पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी

स्वच्छतेचे जनक, विज्ञानवादी, थोर समाजसुधारक राष्टसंत गाडगे बाबा यांच्या जयंती निमित्त काळेवाडी येथे भव्य रथयात्रा व मिरवणूक सोहळा उत्साहात पार पडला. मिरवणुकीचे उद्घाटन शिवसेना (उबाठा) चिंचवड विधानसभा अध्यक्ष मा. हरेश नखाते व युवा नेते सोमनाथ तापकीर यांच्या हस्ते करण्यात आले. मिरवणुकीमध्ये वारकरी संप्रदायातील विद्यार्थी व लेझीम पथकातील मुलीनी त्याच्या सादरीकरणानी सर्वांचे लक्ष वेधले. राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या मुर्तीची रथातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. मंगळवार दिनांक २५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सहा ते नऊ या वेळेत मिरवणूक कार्यक्रम झाला. यामध्ये मुख्य आकर्षण म्हणून लेझिम पथक, वारकरी दिंडीमुळे कार्यक्रमाला शोभा आली. तसेच संत गाडगे महाराजांची मूर्ती असलेला भव्य रथ मिरवणुकीत असल्याने नागरिकांना महाराजांचे दर्शन घेता आले. सोमनाथ नाडे यांच्या व्याख्यानाने कार्यक्रमाची



सांगता झाली. दरम्यान उपस्थित नागरिकांनी तीर्थप्रसादाचा लाभ घेतलायावेळी प्रसिद्ध व्याख्याते सोमनाथ नाडे म्हणाले कि, राष्ट्रसंत गाडगे महाराज हे सत्याशोधक संपादक होते. ते ''जनता जनार्दन'' या पक्षिकाचे मुख्य संपादक होते. तर संपादक प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे हे होते. गाडगे महाराज हे विलक्षण सत्पुरूष होय त्यांना फक्त स्वच्छतेपर्यंत मर्यादित ठेऊ नये. शिक्षण व वैज्ञानिक दृष्टिकोन हे त्यांच्या जीवनाचे मुळ होते. आभाळाच्या मंडपाखाली दिनदुबळ्यांच्या उद्धारासाठी विनामूल्य विचारांची कीर्तन आरास सजवणारे गाडगे महाराज होय. दगडाची उशी, जमिनीचे अंथरूण आणि आकाशाला पांघरून समजत साधी रहाणी मान्य होती पण खोटा दिखावा मान्य नव्हता. तत्कालीन सर्व स्तरातील लोकांसाठी बाबा आदर्श होते. सिंहाला पाहावे वनात, हत्तीला पहावे पाण्यात आणि गाडगे बाबांना पहावे ते किर्तनात...!

यावेळी उपस्थित पत्रकार गणेश मोकाशी सर, पत्रकार अनिल वडघुले, पत्रकार सागर सुर्यवंशी, पत्रकार विनय सोनवणे, महाराष्ट्र परिट धोबी सेवा मंडळ महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष संतोष भालेकर, लॉन्ड्री संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सुनिल पवार,युवा नेते नरेश कदम, शिवशाही व्यापारी संघ अध्यक्ष युवराज दाखले, राष्ट्रवादी ओबीसी सेल शहराध्यक्ष भाई विशाल जाधव, व परिट धोबी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमासाठी सहकार्य करणारे, निळ वादळ प्रतिष्ठाण चे अध्यक्ष, जितेंद्र मोटे, गौरी मोटे, शिवाजी खडसे, पत्रकार महावीर जाधव यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन सकल परिट समाज पिंपरी चिंचवड व पत्रकार संतोष गोतावळे, सुरज राक्षे, सौ.वैशाली ताई राऊत, सौ.कल्पना ताई गायकवाड, शशिकांत राक्षे, दत्तात्रय सौदागर, यांनी परिश्रम घेतले.

# पाण्यासाठी नागरिक, महिलांचा ग्रामपंचायत कार्यालयावर हंडा मोर्चा

## पाण्याविना जनतेचे हाल; तलवाडा ग्रामपंचायतीचा ढिसाळ करभरचा पाडा सुरूच

## अंबिकानगर येथील पाणी पुरवठा दीड महिन्यापासून बंद; योजनाचा निधी हडप

गेवराई । प्रतिनिधी

**उन्हाळा सुरू होताच तलवाडा कराना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असून पंधरा ते वीस दिवसाला येणारे पाणी महींना महिना येत नसल्याने महिला आणि नागरिक चांगले संतापले आहेत यासाठी २२ फेब्रुवारी रोजी महिला हंडे घेवून ग्रामपंचायत कार्यालय समोर ठिय्या मांडून बसल्या होत्या. यावेळी दोन तीन दिवसात पाणी पुरवठा सुरळीत करण्यात येईल असे ग्रामपंचायत प्रशासना तर्फे सांगण्यात आले होते परंतु अद्याप ही पाणी आले नसल्याने पुन्हा ग्रामपंचायत कार्यालयावर हंडा मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. याबाबत चे लेखी निवेदन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर,जयदेव शिंगणे, सुनीता (भाभी) गील यांच्या सह महिला आणि नागरिकांनी पंचायत समिती कार्यालय गेवराई याठिकाणी दिले आहे.**



दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, तलवाडा याठिकाणी कोट्यवधी रुपये खर्चून जलस्वराज्य योजना सुरू करण्यात आली होती परंतु नव्याने निवडून आलेले कार्यकारी मंडळ हे योजना राबवण्यात कुचकामी ठरत असून नागरिकांना वेळेवर सुविधा देण्यास निष्क्रिय झाले आहेत.पाणी पुरवठा सुरळीत करण्यात येत नसून जलजिवन योजनेचे काम ही संथ गतीने सुरू आहे.त्यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत असून पाणी सुरळीत सोडण्यास सांगितले असता उडवा उडविची उत्तरे देतात. महिला, मुली, वयोवृध्द यांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याने दिनांक २२ फेब्रुवारी शनिवार रोजी काही महिला आक्रमक होऊन ग्रामपंचायत समोर ठिय्या मांडून बसल्या होत्या.

यावेळी त्यांना काही काळ ताटकळत बसण्याची वेळ आली होती. यामध्ये उपसरपंच आक्रम सौदागर यांनी मध्यस्थी करून मार्ग काढू असे आश्वासन दिल्यानंतर त्यांनी त्यांच्या शब्दाला मान देत दोन तीन दिवसाचा वेळ दिला होता परंतु सरपंच पती आणि काही हलगर्जीपणा करणारे यांच्यामुळे अजून ही पाणी पुरवठा सुरळीत झाला नसून अध्यप पाणी न आल्याने दिनांक १ मार्च रोजी ग्रामपंचायत च्या ढिसाळ कामकाच्या विरोधात हंडा मोर्चा काढण्यात येणार असल्याचे सुनीता गिल (भाभी), स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर, जयदेव शिंगणे यांच्यासह महिला नागरिकांनी प्रशासनाला निवेदनाद्वारे इशारा दिला असून हंडा मोर्चास पोलीस स्टेशन मार्फत सहकार्य मिळावे अशी विंनती केली आहे. यावेळी काही अनुचित प्रकार घडल्यास ग्रामपंचायत प्रशासन जबाबदार राहील असेही दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.




# बीड पंचायत समितीचे अधिकारी झोपेत; जाहिरातकर्ते मजेत!

बीड । प्रतिनिधी

बीड नगर परिषदेने एकीकडे शहरातील रस्त्यांवर असलेले अतिक्रमण तसेच डिजिटल बॅनर काढण्याची मोहीम गेल्या काही दिवसांपासून शहरात राबवली असताना या मोहिमेस बीड पंचायत समितीच्या निष्क्रिय अधिकाऱ्यांमुळे गालबोट लागत आहे. बीड पंचायत समितीच्या नवीन इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर दोन्ही बाजूने खाजगी जाहिरातकर्त्यांचे दोन भले मोठे डिजिटल बॅनर लावलेले दिसत आहे. यामुळे बीड पंचायत समितीचे अधिकारी झोपेत तर जाहिरातकर्ते मजेत असे म्हणण्याची वेळ आली असल्याची प्रतिक्रिया येथील जाहिरातींचे बॅनर पाहिल्यानंतर मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून व्यक्त केले आहे. याकडे बीड नगर परिषदेने लक्ष देऊन दंडात्मक कारवाई करावी असे म्हटले आहे.

**बीड नगर परिषदेच्या मोहिमेस गालबोट; दंडात्मक कारवाया करा : एस.एम.युसूफ**

बीड शहरात ज्याच्या मनात येईल तो उठतो आणि कुठेही डिजिटल बॅनर लावत सुटतो. अशाप्रकारे लावण्यात येणाऱ्या डिजिटल बॅनर च्या गुत्तेदारांकडून किंवा जाहिरातकर्त्यांकडून शासनाला किंवा बीड नगर परिषदेला महसूल रूपात एक छदामही मिळत नाही. परंतु शहराचे विद्रूपीकरण मात्र होते. गेल्या काही वर्षात फक्त बीड शहरच नाही तर सगळीकडेच अत्यांत खालच्या पातळीचे तसेच गलिच्छ राजकारण होत असल्याने अशा प्रकारे डिजिटल बॅनरचा सुळसुळाट करणाऱ्यांवर कोणाचा वचकच राहिला नाही. परंतु कसे कोणास ठाऊक गेल्या काही दिवसांपासून बीड नगर परिषद अचानकच कर्तव्यदक्ष झाल्याने शहरातील विविध रस्त्यांवरील अतिक्रमणे तसेच डिजिटल बॅनर काढण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. बीड पंचायत समितीचे कार्यालय हे शहराच्या बीड-अहेमदनगर या राज्य मार्गावर नगर नाका परिसरात आहे. गेल्या वर्षीच या पंचायत समितीची नवी प्रशस्त इमारत तयार करण्यात आली आणि जुन्या इमारती मधून या नवीन इमारतीत पंचायत समिती स्थलांतरित करण्यात आली आहे. याच इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वारावर दोन्ही बाजूने खाजगी जाहिरातकर्त्यांचे दोन मोठे डिजिटल बॅनर लावण्यात आलेले आहे.

या कार्यालयात असलेले अधिकारी आणि कर्मचारी यांना दिवसातून अनेकदा ये-जा करताना हे बॅनर दिसत नाही का? की ते झोपेत आहेत? असे प्रश्न पडत आहे. अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेमुळे अशाप्रकारे खाजगी जाहिरातकर्ते मात्र मजेत असून मनाला येईल तिथे विनामूल्य बॅनर लावायला मिळत असल्याने त्यांच्याकडून शहराचे विद्रूपीकरण होत आहे. परंतु सरकारी अधिकारी आणि कर्मचारी मात्र डोळे असून सुद्धा आंधळ्यासारखे कार्यालयात ये-जा करत असल्याचे प्रतीत होत असल्याचे मत ही मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून व्यक्त केले असून बीड नगर परिषदेने असे अनधिकृत व विनामूल्य जाहिरातींच्या फलकांनी विद्रूपीकरण करणाऱ्यांचे बॅनर जप्त करून जाहिरातकर्त्यांसह बॅनर लावणाऱ्यांवर जबर दंडात्मक कारवाया कराव्यात असे म्हटले आहे.

# जिलेटीनची खुलेआम वाहतूक जोरात

## प्रशासनाकडून ना चौकशी ना कारवाई!

आष्टी । प्रतिनिधी

विहीर, रस्ता, खडक, फोडण्यासाठी वापर केला जाणाऱ्या जिलेटीन कांड्या घेऊन बंद चारचाकी गाडीत खुलेआम वाहतूक केली जात असताना त्या वाहनाची ना चौकशी होते ना कारवाई स्थानिक प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याने भविष्यात एखादी दुर्दैवी घटना घडली तर याला जबाबदार कोण? असा प्रश्न आता जनतेतुन उपस्थित केला जात आहे. बीड नगर राष्ट्रीय महामार्ग, बीड धामणगांव नगर राज्य महामार्ग हे दोनही मार्ग आष्टी तालुक्यातून जात आहेत.याच रस्त्यावरून मोठ्या प्रमाणावर जिलेटीन कांड्या घेऊन बंद वाहने सुसाट जात आहेत. मग या वाहनाला कोणाची परवानगी आहे, असेल तर किती साठा आहे, कोणाकडे खाली करायचा, किती करायचा, ज्याला कांड्या द्यायच्या त्या व्यक्तीकडे परवाना आहे का ? असे एक ना अनेक प्रश्न उपस्थित होत असताना याकडे स्थानिक प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात असल्याने ही वाहतूक खुलेआम केली जात आहे.

तालुक्यातील अनेक गावात सध्या विहीर खोदकाम करण्याचे काम सुरू आहे. या कामावर या जिलेटीन कांड्या पुरवल्या जातात. मग हे खोदकाम करत असताना एखादा स्फोट होऊन जर दुर्दैवी घटना घडली.जीव गेला तर याला जबाबदार कोण? प्रशासनाकडून जिलेटीन ची वाहतूक करणाऱ्या वाहनाला साध हटकलं जात नाही तर कारवाई बाजूलाच मग यातुन कोणाचे आर्थिक हित साधत आहे. हे न उलडणारे कोडे आहे. जिलेटीन कांड्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करावी अशी मागणी शिवक्रांती सेनेचे युवक प्रदेश अध्यक्ष दिपक सोनवणे यांनी केली आहे. काय असतात जिलेटीनच्या कांड्या? जिलेटीनच्या कांड्यांचा वापर स्फोटक म्हणून केला जातो.

विशेषतः खाणकाम, विहिरी खणणं, रस्ते किंवा इतर कामांदरम्यान अडथळा ठरणारे मोठमोठे दगड किंवा खडक फोडण्यासाठी जिलेटीनचा वापर केला जातो. यामध्ये मोठे होल किंवा छिद्र करून त्यामध्ये जिलेटीनच्या कांड्या ठेवल्या जातात, त्यानंतर लांबून वात पेटवून स्फोट होतो.

**आष्टी तालुक्यात मोठ्या प्रमाणावर वापर!**

सध्या आष्टी तालुक्यातील अनेक गावात नवीन विहीर खोदकाम सुरू असल्याने जिलेटीनच्या कांड्या सर्रासपणे वापरले जात आहेत. याची देखील चौकशी व्हावी. विनापरवा वापरली जात असतील तर कारवाई करणे आवश्यक आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे तक्रार करून तत्काळ कारवाईची मागणी

# सोलर पोल हायमस्ट दिवे बसवण्यात बीड शहरात मोठा भ्रष्टाचार : कोकाटे

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र सुवर्ण जयंती शहरी नगरोत्थान महाअभियाने व दलितवस्ती योजनेच्या सोलर पोल हायमास्ट दिवे बसविण्याच्या योजनेत संबंधीताकडून निकृष्ठ दर्जाचे साहीत्या वापरून भष्ट्राचार केला आहे.त्या प्रकरणी बीड नगरपालिका सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करावी या मागणीसाठी रिपाईचे अक्षय कोकाटे यांनी बीड जिल्हाधिकारी यांच्याकडे थेट निवेदनाद्वारे तक्रार केली आहे.

बीड नगर परिषदेच्यावतीने नगरोत्थान अभियान व दलितवस्ती योजने अंतर्गत सोलार पोल हायमास्ट दिवे बीड शहरातील विविध भागामध्ये बसविण्यासाठी ५ कोटी २५ लाख रु मान्यता देण्यात आली असुन दलित वस्त्यामध्ये सोलर पोल हायमास्ट दिवे बसविण्यासाठी १ कोटी उपायाची मान्यता देण्यात आली आहे. या दोन्ही योजनेत अधिकाऱ्यांच्या संगनमताने ज्या मध्ये न.प. अभियंता उदय ई पिल्ले व मा.मुख्याधिकारी न.प.बीड यांच्या मोहीनीराज - कन्ट्रक्शन व संदिप इलेक्ट्रिकल यांच्या मार्फत दलितवस्ती योजने मधून कामे करुयात येत असून



नगरोत्थान महाअभियान मार्फत साबेर कन्ट्रक्शन पाटोदा यांच्या कडून सोलर पोल हायमास्ट दिवे बसविण्याची कामे करण्यत येत आहेत. दोन्ही योजनेतील कामात बसवण्यात आलेल्या पोलची अंदाजित रक्कम व प्रत्यक्ष बसवण्यात आलेल्या पोलची रक्कम या मध्ये भष्ट्राचार झालेला असून निकृष्ट दर्जाचे साहीत्या संबंधीत एजन्सीकडून वापरून संगनमताने करोडो रुपायाचा भ्रष्टाचार केला आहे.

या प्रकरणातील अभियंता, न.प.मुख्याधिकारी व संबंधीत कामे करणाऱ्या कंट्रक्शनची निपक्षपाती पणे चौकशी करून या दोन्ही योजनेची कामे करणाऱ्या कन्ट्रक्शन वर संगनमताने भ्रष्टाचार करीत निकृष्ट दर्जाचे साहित्या वापरून शासनाची फसवणूक केल्याबद्दल गुन्हे नोंद करण्यात यावेत. व त्यांची मान्यता रद्द करण्यात यावी अशा मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहे. याप्रसंगी.रिपाईचे शहर सचिव अक्षय कोकाटे, युवा शहराध्यक्ष भैय्यासाहेब मस्के,धम्मा पारवे आदीं उपस्थित होते.

# श्री क्षेत्र रामगड संस्थान हे सर्वसामान्य भक्ताचे आशास्थान : राजेंद्र मस्के

बीड । प्रतिनिधी

सौंदाना ता.बीड येथे श्री क्षेत्र रामगडाचा वार्षिक सप्ताहाची सांगता महंत श्री स्वामी योगीराज महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने संपन्न झाली,यावेळी बीड जिल्ह्याचे खा. बजरंग बप्पा सोनवणे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के उपस्थित होते.या सप्ताहासाठी सौंदाना परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी गावकऱ्यांसोबत संवाद साधताना



म्हणाले की, मी या गावांच्या व परिसरातील नागरिकांच्या आशीर्वादाने मी बीड चा खासदार झालो आहे.बीडच्या जनतेने मला खूप प्रेम दिलं आता माझी परीक्षा आहे, मतदार सर्वसामान्य व नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी रात्रीचे दिवस करणारा पण सामान्य माणसावर अन्याय होऊ देणार नाही. मी पण महाराज रामाचा भक्त बजरंग आहे. त्यामुळे मी कोणालाच घाबरत नाही असे उद्गार बजरंग सोनवणे यांनी काढले.

यावेळी राजेंद्र मस्के असे म्हणाले की श्री क्षेत्रा रामगड हे संस्थान सर्वसामान्य भक्ताचे आशास्थान आहे, महंत श्री योगीराज महाराज यांच्या नेतृत्वात खाली गडाचा विकास होत आहे. भक्तांचे देखील योगदान मोठ्या प्रमाणात आहे जो भक्त रामगडाची निष्ठा ठेवतो त्याला कधीच काही कमी पडत नाही. असे मत जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केले. यावेळी पिंटू ठोंबरे, दुशंत डोंगरे ,परमेश्वर तळेकर, कथले सर,संपत कुटुळे सह या परिसरातील सरपंच उपसरपंच गावकरी,महिला भगिनी, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गाळमुक्त धरण योजनेचा लाभ घ्यावा : आ. पंडित

गेवराई । प्रतिनिधी

गाळमुक्त धरण योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आ.विजयसिंह पंडित यांच्या पुढाकारातून गेवराईमध्ये चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित, जिल्हाधिकारी अविनाश पाठक व नाम फाऊंडेशनचे मराठवाडा समन्वयक राजाभाऊ शेळके यांनी यावेळी मार्गदर्शन केले. मतदार संघातील नदी नाल्यांचे खोलीकरण, सरळीकरण व रुंदीकरण कामासह तलावातील गाळ काढण्याचा यामध्ये समावेश असून आता शेतकऱ्यांना गाळ घेवून जाण्यासाठी अवनी ॲपच्या माध्यमातून प्रतीहेक्टरी १७ हजार रुपये अनुदान मिळणार आहे. त्यामुळे गाळमुक्त धरण योजनेचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा असे आवाहन आ.विजयसिंह पंडित यांनी केले.

गाळमुक्त धरण योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आ.विजयसिंह पंडित यांच्या पुढाकारातून गुरुवार, दि.२७ रोजी दुपारी र.भ.अट्टल महाविद्यालयाच्या गोदावरी सभागृहात चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. चर्चासत्रात जय भवानी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित, जिल्हाधिकारी अविनाश पाठक, नाम फाऊंडेशनचे मराठवाडा समन्वयक राजाभाऊ शेळके यांच्यासह आदींनी मार्गदर्शन केले. यावेळी सहाय्यक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे, तहसिलदार संदिप खोमणे, गटविकास अधिकारी श्रीमती कांबळे, जि.प. लघु पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता हेमंत पिंपळगावकर, बीड पाटबंधारे विभागाचे उपअभियंता विशाल हात्ते, जायकवाडी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता नखाते, जिल्हा जलसंधारण अधिकारी ठोंबरे, जि.प.लघु पाटबंधारे उपविभागीय अभियंता आर.डी.पठाण यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते. याप्रसंगी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी संपुर्ण योजनेचा आढावा घेवून आराखडा अंतिम मंजुरीसाठी सादर करण्याच्या सूचना दिल्या.

गेवराई शहरालगतच्या विद्रुपा नदीवरील शहरातील कचरा मोठ्या प्रमाणावर टाकल्यामुळे नदीचे पात्र अरुंद झाले होते. महापुर परिस्थितीत या नदीचे पाणी शहरातील नागरीकांच्या घरात गेल्यामुळे नदीकाठच्या नागरीकांचे मोठे नुकसान झाले या पार्श्वभुमीवर आ.विजयसिंह पंडित यांनी विद्रुपा नदी गाळमुक्त करण्यासाठी त्याचे खोलीकरण, सरळीकरण व रुंदीकरणाचे काम या योजनेत समाविष्ट केलेले आहे. विद्रुपा नदीबरोबरच गेवराई तालुक्यातील अमृता नदीचा समावेश सुध्दा या योजनेत करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या या महत्वाकांक्षी योजनेत नाम फाऊंडेशन आणि टाटा मोटार्स यांचाही मोठा सहभाग असणार आहे. या योजनेसाठी अवनी ॲपची निर्मिती केली असून योजनेच्या माध्यमातून निघणारा गाळ घेवून जाण्यासाठी शेतकऱ्यांना प्रतीहेक्टरी १७ हजार रुपये शासन अनुदान मिळणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेत सहभाग नोंदवून आपली शेती समृध्द करून घ्यावी असे आवाहन आ.विजयसिंह पंडित यांनी केले आहे.

गाळमुक्त धरण योजना अधिक सक्षमपणे राबविण्यासाठी कृती आराखडा तयार करून अंतिम मान्यतेसाठी तातडीने पाठविण्याच्या सूचना जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दिल्या. जिल्हा जलसंधारण अधिकाऱ्याच्यावतीने ठोंबरे यांनी या बाबतची माहिती दिली. चर्चासत्राला भवानी बँकेचे चेअरमन बप्पासाहेब मोटे, जय भवानी कारखान्याचे व्हा.चेअरमन भाऊसाहेब नाटकर, बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, खरेदीविक्री संघाचे अध्यक्ष जयदिप औटी, उपसभापती विकास सानप, सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष कालिदास नवले, गेवराई तालुक्यातील संबंधित गावचे सरपंच, ग्रामसेवक, विविध संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT